**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांक : 12.05.2024** **रविवार**

---

**ठळक बातम्या**

१. **लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातल्या प्रचाराची रणधुमाळी थांबली. उद्या होणार मतदान.**
२. **प्रचाराच्या शेवटच्या दिवशी राज्यात वरीष्ठ राष्ट्रीय नेत्यांच्या प्रचारसभा.**
३. **मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज.**
४. **राजकीय आरोप प्रत्यारोपांच्या गदारोळात नाशिकमधल्या पर्यावरणप्रेमींचा आगळा जाहीरनामा.**
**आणि**
५. **पुण्यासह सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यात जोरदार पाऊस. आजही मध्य महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाड्यात तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा आणि गारांसह पावसाचा अंदाज.**

**प्रचार**
लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातल्या प्रचाराची धामधूम काल थांबली. या टप्प्यात उद्या पुणे जिल्ह्यातल्या पुणे, शिरुर आणि मावळ या मतदारसंघांसह अहमदनगर, शिर्डी, नंदूरबार, जळगाव, रावेर, जालना, छत्रपती संभाजीनगर आणि बीड इथं मतदान होणार आहे. पुण्यातले महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांच्या प्रचारासाठी केंद्रिय मंत्री नितीन गडकरी यांनी काल प्रचारसभा घेतली. देशाच्या प्रगतीसाठी आणि सुखसमृद्धीसाठी भाजपाच्या मागे खंबीरपणे उभे राहा, असं आवाहन गडकरी यांनी यावेळी केलं. देशाची अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी आणि देशाला विश्वगुरू बनवण्यासाठी योग्य नेतृत्व आवश्यक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देशाचा विकास होत आहे असं सांगून राज्यातल्या पायाभूत विकासाची माहिती त्यांनी दिली. काँग्रेसकडे विकासाचा मुद्दा नसल्यामुळे ते भाजपाबद्दल अपप्रचार करत आहेत. जातीचं राजकारण करत आहेत अशी टीका गडकरींनी केली. दरम्यान, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचीही पुण्यात काल प्रचारसभा झाली. ही निवडणूक देशाचा नेता निवडण्यासाठी आहे. देश मजबूत करण्यासाठी नरेंद्र मोदी यांच्यामागे भक्कमपणे उभे राहा असं आवाहन फडणवीस यांनी केलं. सरकारच्या विविध योजनांची आणि विकासकामांची माहिती त्यांनी यावेळी दिली.

शिरूर लोकसभा मतदार संघातले महाविकास आघाडीचे उमेदवार डॉक्टर अमोल कोल्हे यांच्या प्रचारासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी प्रचारसभा घेतली. लोकशाही टिकवायची असेल तर नेहरू आणि गांधींचे विचार मजबूत करायला हवेत असं पवार म्हणाले. दहा वर्षात काय केलं आणि पुढे काय करणार, कुठले विकास प्रकल्प हाती घेणार, याविषयी मोदी बोलत नाहीत अशी टीका त्यांनी सत्ताधाऱ्यांवर केली. पूर्वी निवडणुका दोन ते तीन टप्प्यांमध्ये होत होत्या, मात्र आता सहा ते सात टप्प्यांमध्ये निवडणुका होत आहेत. ही बाब निवडणूक आयोगावर संशय निर्माण करणारी असल्याचं पवार यावेळी म्हणाले.

लोकशाहीला वाचवण्यासाठी ही निवडणूक आहे असं काँग्रेस नेते अभिषेक मनू संघवी काल पुण्यात श्रमिक पत्रकार संघाच्या वतीनं आयोजित वार्तालाप कार्यक्रमात म्हणाले. सरकार स्थापनेसाठी 272 इतकं संख्याबळ आवश्यक असताना त्यांना 400 पार कशासाठी हवे आहेत असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

काँग्रेसच्या नेतृत्वातल्या सरकारांनी अनुसूचित जाती जमातींच्या कल्याणासाठीचे कायदे तसंच आदिवासी समाजासाठीचा वनहक्क कायदा केला, तसंच  मनरेगा योजना आणली असं काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियांका गांधी म्हणाल्या. त्यांनी मणीपूरमधल्या हिंसाचाराच्या घटनांचा तसंच महिला कुस्तीपटूंच्या आंदोलनाचा उल्लेख करत सत्ताधारी भाजपावर टीका केली. नंदूरबारमधले काँग्रेसचे उमेदवार ॲडव्होकेट गोवाल पाडवी यांच्या प्रचारासाठी घेतलेल्या सभेत त्या बोलत होत्या.

**मतदान तयारी**

राज्यात उद्या होणाऱ्या चौथ्या टप्प्यातल्या मतदानासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे. मतदान केंद्रांवर पुरेशा सोई सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत, तसंच वैद्यकीय मदतही तैनात करण्यात आली आहे. दिव्यांग, वृद्ध मतदारांसाठी चाकाच्या खुर्चीची व्यवस्था करण्यात आली आहे. या निवडणुकीत पुणे शहरातल्या मोठ्या ३५ गृहनिर्माण सोसायट्यांमधून प्रथमच मतदान केंद्राची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून त्याचा फायदा सुमारे ५० हजार मतदारांना होणार आहे. मतदार केंद्रांच्या १०० मीटर परिसरात कोणालाही मोबाईल घेऊन प्रवेश करता येणार नसल्यानं मतदारांनी मतदानाला जाताना मोबाईल सोबत नेऊ नये, असं आवाहन पुण्याचे जिल्हाधिकारी डॉक्टर सुहास दिवसे यांनी केलं आहे.

*साउंड बाइट*

***आपण जेव्हा मतदान करतात तेव्हा मतदानाची गुप्तता पाळण हे मतदाराचा आद्य कर्तव्य आहे. मतदान केंद्रांवर कुठल्याही प्रकारची फोटोग्राफी हे व्हिडिओ ग्राफी ही कायद्यान अलाउड नाही. त्याच्यावर बंधन आहे. त्यामुळे 100 मीटर परिसरात मतदान केंद्राच्या कोणत्याही मतदारांना आपला मोबाईल फोन नेता येणार नाही. याची कृपया सर्व मतदारांनी नोंद घ्यावी. या बाबतीमध्ये आम्ही सर्वांना सूचना दिलेल्या आहेत. कोणत्याही प्रकारची आपली गैरसोय होणार नाही. आपल्याला ही माहिती मिळावी हेतून, आम्ही ही माहिती देत आहोत. आपण निश्चितपणे १३ तारखेला मतदान केंद्रावर जाऊन मतदान करावं, अशी मी पुन्हा एकदा आपल्याला विनंती करतो.***

-----------------

नंदुरबार जिल्ह्यातल्या अतिशय खडतर समजल्या जाणाऱ्या नर्मदा काठावरील पाच मतदान केंद्रांवर जाण्यासाठी पोलिसांसह अधिकारी आणि कर्मचारी काल रवाना झाले. या पाच मतदान केंद्रांपर्यंत पोहोचण्यासाठी सुरुवातीला गुजरातमधून दीडशे किलोमीटरचा प्रवास करुन केवडीया कॉलनीत आणि त्यानंतर सरदार सरोवराच्या जलाशयातून मतदान केंद्राकडे बार्ज म्हणजेच छोट्या तराफासदृश नौकेद्वारे मतदान साहित्य घेऊन जावं लागतं. यात राज्यातलं पहिलं मतदान केंद्र असणाऱ्या मणिबेली मतदान केंद्राचा समावेश आहे. दरम्यान, उद्या चौथ्या टप्प्यात मतदान होणाऱ्या मतदार संघांमध्ये राज्य शासनानं सुटी जाहीर केली आहे. संबंधित मतदारसंघांच्या क्षेत्रातील जे मतदार कामासाठी मतदार संघांच्या बाहेर असतील, त्यांना तसंच राज्य आणि केंद्र शासन, निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम आणि इतर आस्थापना आदींना ही सार्वजनिक सुटी लागू राहील.

**या प्रादेशिक बातम्या आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरुन ऐकत आहात.**

**व्हॉइस कास्ट**

सध्या देशात लोकसभा निवडणुकीचे वारे सर्वत्र वाहत आहेत. निवडणुकीच्या काळात राजकीय पक्षांच्या जाहीरनाम्यावरही जोरदार चर्चा, आरोप-प्रत्यारोप होत असतात. मात्र नाशिकमध्ये सध्या चर्चा आहे ती पर्यावरणप्रेमींच्या अनोख्या जाहीरनाम्याची. काय आहे हा जाहीरनामा जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून,

*मतदान करा फुल*
*नाशिक करा कूल*

*हे या जाहीरनाम्याचं ब्रीदवाक्य आहे. कधी काळी थंड हवेचं ठिकाण मानलं जात असलेल्या नाशिकमधल्या वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण संरक्षणाच्या मुद्द्यांचा यात समावेश करण्यात आला आहे. नदी संवर्धनासाठी पूररेषेत कोणतीही बांधकामे होऊ देऊ नयेत, डोंगरांवर वृक्षारोपण करावं, प्रादेशिक गोवंश जगवून प्रदूषण मुक्त, विषमुक्त शाश्वत ग्रामविकासासाठी प्रयत्न करावे, शिवकालीन गड किल्ले आणि डोंगर यांचं संवर्धन करावं असं आवाहन यात राजकीय पक्षांना करण्यात आलं आहे. पर्यावरणप्रेमी नागरिक निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांनाही हा जाहीरनामा देत आहेत. या अनोख्या जाहीरनाम्याच्या प्रचाराद्वारे मतदानाबरोबरच शहरात पर्यावरणाबाबतही जनजागृती केली जात आहे.*

*आकाशवाणीच्या बातम्यांसाठी आमचे नाशिकचे प्रतिनिधी संजय पाठक यांच्यासह सुरेखा जोशी पुणे.*

**हापूस दिन**

११ मे हा दिवस देवगड हापूस दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्त सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या कुणकेश्वर मंदिरात काल हजारो हापूस आंब्यांची आरास करण्यात आली होती. हा सोहळा पाहण्यासाठी भाविकांनी मंदिरात गर्दी केली होती. देवगड मधले व्यावसायिक, आंबा बागायतदार आणि ग्रामस्थांच्या पुढाकारातून हापूस दिन साजरा करण्यात आला.

**अपघात**

सोलापूर जिल्ह्यात काल सांगोला-जत मार्गावर जीपचा टायर फुटून झालेल्या अपघातात तीन महिलांचा मृत्यू झाला. यात दोन महिला गंभीर जखमी झाल्या असून त्यांच्यावर मिरज इथं उपचार केले जात आहेत. अपघातग्रस्त जीपमधून कर्नाटकातल्या चौदा महिला मजूर पंढरपूर तालुक्यातल्या पाचेगांव इथं द्राक्षबागेत काम करण्यासाठी चालल्या होत्या.

**उष्माघात**

परभणी जिल्ह्यात गेले काही दिवस कमाल तापमान ४० अंशांच्या पुढे असून उष्माघातामुळे गेल्या आठवड्यात दोन नागरिकांचा मृत्यू झाला आहे.

**पाऊस**

पुण्यासह सांगली, सातारा, अहमदनगर जिल्ह्यात काल जोरदार पाऊस झाला. सांगली जिल्ह्यात काही ठिकाणी झाडं, वीजेचे खांब उन्मळून पडल्याच्या घटना घडल्या. कोल्हापूर जिल्ह्यातही जोरदार पाऊस झाला. हातकणंगलेत ढगफुटी सदृश पाऊस झाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. अनेक ठिकाणी झाडं उन्मळून पडल्याचं वृत्त आहे. रत्नागिरी जिल्ह्याच्या खेड, चिपळूण आणि संगमेश्वर तालुक्यात देखील काही ठिकाणी काल पावसाने हजेरी लावली.

**हवामान**

राज्यात बीड, अकोला, अमरावती, मालेगाव, वाशिम, वर्धा आणि यवतमाळ जिल्ह्यात कमाल तापमान अद्यापही ४० अंशांच्या पुढेच आहे. विदर्भात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात सरासरीच्या तुलनेत उल्लेखनीय घट झाली तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी सरासरीच्या तुलनेत किंचित घट झाली आहे. उर्वरित राज्यात कमाल तापमान सरासरीच्या जवळपास होतं. येत्या २४ तासांत कोकणात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस पडेल आणि मध्य महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाड्यात तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा तसंच गारांसह पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**